# १०. विशेष गरजा असणारी बालके



सक्षम बालकांपेक्षा जी बालके शारीरिकदृष्ट्या, मानसिकदृष्ट्या, बौध्दिकदृष्ट्या, भावनिकदृष्ट्या आणि सामाजिकदृष्ट्या वेगळी असतात व ज्या बालकांना विशिष्ट सेवांची गरज असते, विशेष निवासी व्यवस्था लागतात व शालेय शिक्षणाच्या नेहमीच्या पद्धतींमध्ये बदल करावे लागतात अशा बालकांसाठी ''विशेष गरजांनुसार शिक्षण'' असते. (Special Needs Education) उदा. शारीरिक अक्षमता म्हणजेच पायाच्या अक्षमता असणाऱ्या व्यक्तिंसाठी म्हणून जिन्याच्या जोडीने उतार असायला हवेत किंवा अध्ययन अक्षम बालकांसाठी अभ्यासाची मनोनकाशा तयार करणे, अभ्यास कौशल्य पद्धती अशी तंत्रे गरजेची आहेत.

शिक्षण क्षेत्रामध्ये ''विशेष गरजा'' अशी संज्ञा ज्या विद्यार्थ्यांसाठी वापरली जाते तेव्हा त्यांच्यासाठी ''वैयक्तिक शिक्षण नियोजन'' (Individual Education Plan - IEP) तयार केले जाते. त्यालाच ''वैयक्तिक कार्यक्रम नियोजन'' (Individual Programme Plan) असे संबोधले जाते.

इंडिव्हिज्यूअल विथ डिसॲबिलिटी एज्यूकेशन ॲक्ट (IDEA) या अमेरिकन संस्थेनुसार अक्षम विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण, रोजगार आणि स्वावलंबी जीवनमान यासाठी तयार करायला हवे. युनायटेड नेशन्स यांनी सांगितल्यानुसार आज जगात सद्यस्थितीत १ अब्ज लोक अक्षम आहेत. विविध घटकांमुळे ही संख्या वाढत चालली आहे.

आता जागतिक आरोग्य संस्थेने (WHO) काही संज्ञांचे वर्णन व अर्थ दिला आहे तो समजून घेऊ.

**दोषस्थिती (Impairment)**

It is defined as any loss or abnormality of psychological, physiological or anatomical structure or function.

दोषस्थिती म्हणजेच मानसिक शारीरिक किंवा शरीरकार्य करण्यासाठी लागणाऱ्या रचनेमध्ये दोष निर्माण होणे किंवा तो भाग अनुपस्थित असणे.

**उदा.:** दृष्टी नसणे, ऐकू न येणे.

**अक्षम स्थिती (Disability)**

Disability develops as a consequence of impairment. It is also the inability to carry out certain activities, which are considered as normal for a particular age or sex.

अक्षम स्थिती हा दोषस्थितीचा पुढचा परिणाम असतो. अक्षमता म्हणजेच काही कारणांमुळे ठराविक कृती, कार्य करता येण्यास असमर्थ असणे आणि बरेचदा ही स्थिती कोणत्याही वयाला किंवा स्त्री – पुरूष कोणामध्येही येऊ शकते.

**उदा.:** पाय नसण्यामुळे किंवा पायातील दोषामुळे एखादी व्यक्ती चालण्यास असमर्थ असते.

**माहिती केंद्र**

१९९२ मध्ये युनायटेड नेशन्सच्या सर्वसाधारण सभेत ३ डिसेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय 'अक्षम व्यक्तिदिन' म्हणून (Day of Persons with Disabilities) जाहीर केला. विशेष गरजा असणाऱ्या व्यक्तिंबद्दल जनजागृती करणे, त्यांना समजून घेणे व त्यांना स्वीकारणे हा यामागचा प्रमुख हेतू होता. अक्षम व्यक्तिदिन जाहिर झाल्यामुळे विशेष गरजा असणाऱ्या व्यक्तिंना त्यांची मते व्यक्त करण्यास प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या भोवतालच्या परिस्थितीत सुधारणा घडवण्यास चालना मिळणे हे घडेल हाही हेतू होता.

### अपंग स्थिती (Handicap)

It develops as a consequence of the disability. It is difined as a disadvantage for a given individual resulting from an impairment or a disability, that limits and prevents the fulfilment of a role which is normal for that individual, depending on age, sex, social and cultural factors.

अपंग स्थिती ही अक्षम स्थितिचाच पुढचा परिणाम असते. एखाद्या अपंग व्यक्तीची व्याख्या करताना असे म्हटले जाते की अपंग स्थिती ही त्या व्यक्तिबाबत दोषस्थिती किंवा अक्षम स्थितीतून उद्‌भवली आहे, जी स्थिती त्या व्यक्तिला तिच्या वय, लिंग, सामाजिक व सांस्कृतिक घटकांनुसार सामान्य वर्तन व त्याची भूमिका बजावण्यावर मर्यादा घालते.

**शारीरिक अक्षमता :**

ज्या व्यक्तिंना पंचेंद्रिय सोडून इतर शारीरिक मर्यादा आहेत किंवा आरोग्य समस्या आहेत ज्या समस्यांमुळे बालकांच्या शालेय उपस्थितीमध्ये किंवा अध्ययनामध्ये विशेष सेवांचा अंतर्भाव करावा लागेल, प्रशिक्षणाची गरज पडेल, विशिष्ट साधने, साहित्य लागेल किंवा सुविधा पुरवाव्या लागतील अशा व्यक्तिंना शारीरिक अक्षमता असणाऱ्या व्यक्ति म्हणतात.

### (१) अस्थि अक्षमता (Orthopaedic disability)

#### अ. खुरटा पाय (Club Foot)

मांडीचे हाड खुब्यात ज्या ठिकाणी पक्के बसलेले असते (ball and socket between the femoral head and acetabulum) त्या ठिकाणी व्यत्यय येऊन पायाच्या उंचीत फरक असणे म्हणजे खुरटा पाय. हा परिणाम जास्त करून स्त्रीयांपेक्षा पुरुषांमध्ये आढळतो, परंतु ही अनुवंशिक जनुकीय रचना नाही.

**विशेष गरजांचे वर्गीकरण**
**Classification of Special Needs**

- शारीरिक Physical
- बौध्दिक Intellectual
- अध्ययन अक्षमता Learning disabilities
- असामान्यत्व Gifted
- भावनिक Emotional

**शारीरिक अक्षमता**

**(१) अस्थि अक्षमता**

(अ) खुरटा पाय (club foot)

(ब) फाटलेला ओठ (cleft palate)

(क) स्नायू विकृती (muscular dystrophy)

**(२) चेतासंस्था अक्षमता**

(अ) प्रमस्तिष्क घात (Cerebral palsy)

(ब) स्नायूताठरता (Spasticity)

(क) अपस्मार (Epilepsy)

(ड) पाठीच्या कण्यातील दोष (Spina bifida)

(इ) हात पाय लुळे पडणे (Polio)

**(३) दृष्टी अक्षमता**

(अ) अंधत्व (Blind)

(ब) रंगांधत्व (Colour blindness)

(क) रातांधळेपणे (Night blindness)

**(४) श्रवण अक्षमता**

कर्णबधीर – ऐकू न येणे (Hard of hearing) व अत्यल्प कर्णबधिरत्व (Varying degree of auditory disability)